# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/२८११
कालमर्यादीत

दिनांक : 28 AUG 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत,
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत
व्यावसायिक संस्था

विषय : राज्यस्तरीय सामाईक डी.बी.टी. पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांचे सन २०१८-१९ साठी भरणेबाबत . . . . . . . . . . . . . .

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचा दि. १४/०८/२०१८ रोजीचा ईमेल व पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी/२०१८/३०३, दि. २७/०८/२०१८

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत, खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत व्यावसायिक संस्थांना कळविण्यांत येते की, संदर्भांकीत पत्राद्वारे मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई ह्यांनी कळविल्यानुसार शै.व. २०१८-१९ करिता महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती योजनांच्या अटी व शर्तीनुसार माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डीआयटी) यांचेकडून राज्य शासनामार्फत राबविण्यांत येणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती योजनांसाठी राज्यस्तरीय सामाईक डीबीटी पोर्टल (संकेतस्थळ : http://mahadbtmahait.gov.in) बनविण्यांत आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व व्यावसायिक व इयत्ता १२वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

सामाईक डी.बी.टी. पोर्टलकरिता मुंबई विभागांतर्गतच्या बहुतेक सर्वच संस्थांना महाऑनलाईनने ईमेलद्वारे लॉगिन क्रिडेन्शियल्स पाठविलेले आहेत. आपणांस प्राप्त झालेल्या लॉगिन क्रिडेन्शिअल्सद्वारे संबंधीत संस्थांनी खालील बाबींची पूर्तता करावयाची आहे.

- संस्थेची माहिती (Institute Profile) अंतर्गत येणारी सर्व माहिती अद्ययावत करणे.
- अभ्यासक्रमनिहाय माहिती (Course Details) व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काची अचूक माहिती (Fee Details) अद्ययावत करणे.

...२.

- सामाईक डी.बी.टी. पोर्टलवर सदर माहिती भरण्यासाठी Help Videos उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच पोर्टलवर मूलभूत/पायाभूत माहिती (Basic Information) क्रमवार भरण्यासाठी मार्गदर्शन करणारे सहपत्र आपल्या माहितीसाठी सोबत जोडलेले आहे.
- **पोर्टलद्वारे माहिती भरताना काही अडचण उद्‌भवल्यास त्यासाठी पोर्टलवर देण्यांत आलेल्या Grievence द्वारे महाऑनलाईनला तात्काळ कळविण्यांत यावे तसेच त्याबाबत ह्या कार्यालयास ईमेलद्वारेही कळवावे. (येणाऱ्या अडचणीचा स्क्रीनशॉटही Grievence मध्ये अपलोड करावा. जेणेकरुन आपणांस नक्की कशाप्रकारे मेसेज येतो आहे. ते महाऑनलाईन कळणे सोयीचे होईल)**

ज्या संस्थांना अद्यापही लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त झाले नसतील अशा संस्थांनी ह्या कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधून आपल्या संस्थेचा लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घ्यायचा आहे.

सदर पोर्टलवर विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्मसाठी शासनाच्या निर्देशानुसार नजिकच्या कालावधीत लिंक ओपन करुन देण्यांत येणार आहे. त्यामुळे सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, सर्व प्रकारच्या स्कॉलरशिपच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना सूचित करावे की, त्यांनी सर्व प्रकारची कागदपत्रे पी.डी.एफ. फॉर्म्यटमध्ये २५६ केबी च्या साईझमध्ये स्कॅन करुन तयार ठेवावीत. कारण सदरची कागदपत्रे ऑनलाईन फॉर्म भरताना विद्यार्थ्यांना अपलोड करावयाची आहेत.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहाय्यक संचालक (तां)
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई